# Mukul Madhav Foundation

Established 1999

**SPREAD HOPE, SPREAD HAPPINESS.**

जून २०१८


## जून २०१८ चे वार्तापत्र

### आशा आणि एएनएम च्या परिचारीकांना प्रशिक्षण



पहिल्या टप्प्यात सातारा जिल्ह्यामधील १२ प्राथमिक आरोग्य केंद्रातील ५८२ आशा आणि एएनएम च्या परिचारीकांचे बाळंतपणामध्ये येणाऱ्या अडचणीं सोडविण्यासाठी प्रशिक्षण २ जून रोजी पूर्ण झाले.
याचप्रकारे इतर प्राथमिक आरोग्य केंद्रातील परिचारीकांना प्रशिक्षण देण्याचे ध्येय बाळगून दुसऱ्या टप्प्यात १३३ आशा आणि एएनएम च्या परिचारीकांनी प्राथमिक शिक्षणाचा लाभ घेतला. एकूण ३० तासांचा हा कार्यक्रम ५ आठवड्यांमध्ये विभागण्यात आला.

### न्युरोफिजिओथेरपी शिबिर

रत्नागिरी येथील पुनर्वसन केंद्रात न्युरोफिजिओथेरपी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हे एक विशेष उपचार पद्धती असून सेरेब्रल पाल्सीग्रस्त ३८ रुग्णांची यावेळी तपासणी करण्यात आली.
जि.प. रत्नागिरीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, श्रीमती आंचल गोयल, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अनिरुद्ध आठल्ये, आरबीएसके, तसेच विस्तार अधिकारी, पंचायत समिती, रत्नागिरी, आयएमए रत्नागिरीचे व्हाईस प्रेसिडेंट आणि सर्व शिक्षा अभियानचे एपीओ यांनी आमच्या पुनर्वसन केंद्राला भेट दिली. त्यांच्या स्वागतासाठी फिनोलेक्स इंडस्ट्रीज लि. यांनी एका विशेष संमेलनाचे आयोजन केले होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मुलांशी व त्यांच्या पालकांशी संवाद साधला. त्यावेळी त्यांना फिनोलेक्स आणि एमएमएफ यांच्यातर्फे सेरेब्रल ग्रस्त यांच्यासाठी करण्यात आलेले प्रयत्न प्रकर्षाने जाणविले.





- संचेती हॉस्पिटलच्या डॉ. सलोनी राजे यांच्या हाताखाली उपचार घेणारे रुग्ण
- जि.प. रत्नागिरीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, श्रीमती आंचल गोयल, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अनिरुद्ध आठल्ये, आरबीएसके, तसेच विस्तार अधिकारी, पंचायत समिती, रत्नागिरी, आयएमए रत्नागिरीचे व्हाईस प्रेसिडेंट आणि सर्व शिक्षा अभियानचे एपीओ, न्युरोफिनिओथेरापिस्ट डॉ. सलोनी राजे आणि फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे जनरल मॅनेजर श्री. काकडे

### कुडाळ प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन

अजून एक नवीन प्रकल्प सुरू करण्यात आला तो म्हणजे सातारा (कुडाळ प्राथमिक आरोग्य केंद्र) येथे या महिन्यात ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन. दि. २३ जून २०१८ स्थळ :- सातारा
एकूण १९३ ज्येष्ठ नागरिकांची तपासणी करण्यात आली. पुण्यातील खालील डॉक्टर्स आणि तज्ञांना नेण्यात आले होते.
एच. व्ही. देसाई - नेत्रतज्ञ, बीव्हीपी - ऑडिओलॉजिस्ट
ससून - जनरल प्रॅक्टीशनर्स, स्त्रीरोग तज्ञ, दंतवैद्य, मानसोपचार तज्ञ
संचेती - ऑर्थोपेडायटिक सर्जन, फिजिओथेरपिस्ट
डॉक्टरांच्या या मजबूत संघाबरोबरच आम्हांला स्थानिक आशा तसेच डॉक्टरांचीही मदत मिळाली.





अर्थातच हे सर्व जि.प. अधिकाऱ्यांच्या सहकार्य व आधाराशिवाय शक्य झाले नसते. तसेच शिबिराला मिळालेला प्रतिसाद पाहून ते इतके चकित झाले की त्यांनी आम्हांला जुलै आणि ऑगस्ट महिन्यातही अशा प्रकारचे शिबिर घेण्यासाठी विनंती केली आहे.

## मासिक मधुमेह चाचणी शिबीर - केईएम हॉस्पिटल पुणे - २३ जून २०१८





केईएम हॉस्पिटल येथे टाईप १ व टाईप २ प्रकारातील मधुमेह असलेल्या रुग्णांची चाचणी करण्यासाठी शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी ६ रुग्णांची तपासणी करण्यात आली तसेच २१ रुग्णाला इन्सुलिनचेही वाटप करण्यात आले.

## वैद्यकीय मदत

**२५ गरजू रुग्णांना रु. ४,२५,०००/- इतकी वैद्यकीय मदत करण्यात आली.**

## शैक्षणिक

### मुकुल माधव विद्यालय, रत्नागिरी शाळेची दमदार सुरूवात



दि. ४ जून २०१८ रोजी एमएमव्हीचे विद्यार्थी इयत्ता ९वीमध्ये दाखल झाले आणि त्यांच्या नवीन वर्गखोल्यांचे त्यांनी त्याचदिवशी उद्घाटन केले. क्रीडांगणही खुले करून देण्यात आले जेणेकरून विद्यार्थ्यांना आणखी मोठ्या जागेत धावायला आणि खेळायला मिळेल.

### एमएमव्ही येथे नवीन नर्सरीचे वर्ग



दि. ११ जून २०१८, लहानग्या मुलांसाठीचा नर्सरीचा नवीन वर्ग एमएमव्ही येथे खुला करण्यात आला. २६ विद्यार्थ्यांना पूर्व प्राथमिक विभागात प्रवेश देण्यात आला.

### एमएमव्ही येथे नवीन शैक्षणिक वर्षाची सुरूवात दि. १४ जून २०१८

नवीन शैक्षणिक वर्षाची सुरूवात ! ज्यु.के.जी पासून इयत्ता ९ वी पर्यंतचे वर्ग नवीन शैक्षणिक वर्षात सुरू करण्यात आले. आम्ही त्यांना शुभेच्छा देतो.

### रमजान ईद सोहळा, दि. १५ जून २०१८

शाळेमध्ये ईद मोठ्या आनंदाने आणि उत्साहाने साजरी करण्यात आली. ईदीचे महत्त्व सांगणारे कार्यक्रम विद्यार्थ्यांनी सादर केले. भारतीय संस्कृतीचे विविध पैलू विद्यार्थ्यांना समजावेत याकरीता तसेच प्रत्येक धर्मासाठी व जातीसाठी त्यांची मनाची कवाडे खुली व्हावीत यासाठी मुकुल माधव विद्यालयामध्ये सर्व महत्त्वाचे सण साजरे करण्यात येतात.

## अग्निशमन प्रात्यक्षिक, दि. २२ जून २०१८




फिनोलेक्स इंडस्ट्रीजच्या अग्निशमन आणि सुरक्षा विभागाचे श्री. गुरुराज कुशे यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही एमएमव्हीतील विद्यार्थ्यांसाठी अग्निशमन प्रात्यक्षिकाचे आयोजन केले होते. या सत्रातून विद्यार्थ्यांना आग न लागण्यासाठी काळजी घेण्याबाबत तसेच त्यासाठी तयार राहण्याबाबत आपत्कालीन स्थितीत कसे वागावे याबाबतचे मार्गदर्शन देण्यात आले. या माध्यमातून मुकुल माधव फाऊंडेशन आणि फिनोलेक्स पाईप्स हे विद्यार्थी आणि त्यांचे कर्मचारी यांना अग्निशमन दलातील तज्ञांशी बातचीत करण्याची तसेच आपत्कालीन स्थितीत पाळावयाचा कृती आराखडा जाणून घेण्याची संधी देत आहेत.

## आंतरराष्ट्रीय योग दिवस




मुकुल माधव विद्यालयाच्या योगशिक्षिका सौ. मनिषा घाणेकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित सत्राने आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला. वातनुकूलन, समक्रमण, एकाग्रता आणि स्वावलंबता यासारखे गुण विद्यार्थ्यांनी आत्मसात करावे यादृष्टीने मुकुल माधव विद्यालयामध्ये नियमित अभ्यासक्रमामध्येच योगाचा समावेश केला आहे.

## शाळेचा ८ वा वर्धापनदिन




मुकुल माधव विद्यालयाने दि. २३ जून २०१८ रोजी त्यांचा ८ वा वर्धापनदिन साजरा केला. एमएमव्हीचा प्रवास दाखविणारे नृत्य विद्यार्थ्यांनी यावेळी सादर केले. यावेळी, शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. निलीमा कोटाय्या यांनी प्रोत्साहनपर भाषण केले. विद्यार्थ्यांना चॉकोलेटस वाटून आनंद साजरा करण्यात आला.

**शैक्षणिक मदत - ११ विद्यार्थ्यांसाठी ३,९१,१४०/-रुपये**

## दप्तरांचे वितरण




महाबळेश्वर येथील शाळा नं ५ मधील विद्यार्थ्यांसाठी १९० दप्तरांचे वाटप करण्यात आले. यावेळी पंचायत समिती सदस्य तसेच नगरसेवक उपस्थित होते.

## सत्कार समारंभ





एमसीसीआय येथे समाजासाठी केलेल्या भरीव योगदानाबद्दल सौ. रितू छाब्रिया यांना प्रसिद्ध समाजसेविका श्रीमती मेधा पाटकर यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

मुकुल माधव फाऊंडेशन सीएसआर अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यासाठी समविचारी इतर कंपन्यांशी सहयोग करते.

## वृद्धाश्रमांना डायपर प्रदान





आम्ही एक नवीन उपक्रम सुरू केला आहे. पुणे शहरातील वृद्धाश्रमांना डायपर देण्यात आले. दर महिन्याला अनाथ आश्रम ते इतर २० संस्थांना धान्य देण्याच्या उपक्रमाबरोबरच या उपक्रमाची आम्ही सुरूवात केली आहे. सध्या आभाळमाया आणि देवतारू या २ वृद्धाश्रमांना डायपर देण्यात येत आहेत. दोन्ही वृद्धाश्रम पुणे येथे आहेत. आम्हांला आनंद वाटतो की दोन्ही आश्रमांना डायपरची ३० पाकिटे देण्यात आली.

## क्रिप्स फाऊंडेशनला देणगी



दि. १० जून २०१८ स्थळ पुणे, विशेष विद्यार्थ्यांसाठी काम करणाऱ्या क्रिप्स फाऊंडेशनला दप्तरे आणि दृष्टीहीन पालकांच्या मुलांसाठी पुस्तकांचे वितरण करण्यात आले.

## साल्वेशन आर्मी इन्स्टिट्युटला देणगी






दि. १५ जून २०१८ रोजी मुंबई, सायन, मुंबई येथील साल्वेशन आर्मी इन्स्टिट्युटमधील मुलांना गणवेश, शूज, रेनकोट आणि सामायिक खोलीसाठी दूरदर्शन संच देणगी म्हणून देण्यात आला.
हरसेप्टाईन उपचारासाठी रु १५ लाख तसेच ऑगस्ट मध्ये होणाऱ्या सेमिनार साठी रु. १० लाख अशी २५ लाखाची मदत प्रशांती कॅन्सर केअर मिशनला देण्यात आली.

## जलसंवर्धन

### रेन वॉटर हार्वेस्टिंगचे उद्घाटन





दि. ३१ मे २०१८ स्थळ मासर, सरकारच्या सुजलाम सुफलाम उपक्रमांतर्गत गुजरात सरकारतर्फे रेन वॉटर हार्वेस्टिंग स्थापन करण्याबाबतच्या विनंतीला आम्ही प्रतिसाद दिला. त्याचेच उद्घाटन दि. ३१ मे २०१८ रोजी कार्यकारी दंडाधिकारी श्री. मंगू असारी, मामलातदार आणि पाड्राचे कार्यकारी दंडाधिकारी तसेच फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे अधिकारी यांच्या उपस्थिती संपन्न झाला. या माध्यमातून अंदाजे १,३०,००० लिटर इतके पाणी साठविता येणे अपेक्षित आहे.

## पाणी प्रकल्पाचे उद्घाटन



मुकुल माधव फाऊंडेशन आणि फिनोलेक्स इंडस्ट्रीज यांनी २००६ नंतर अनेक पाणी प्रकल्पावर काम केले आहे. गोळप येथील मुस्लिम मोहल्लूयामधील गावकऱ्यांनी मुकुल माधव फाऊंडेशन आणि फिनोलेक्स इंडस्ट्रीज यांच्याकडे बोअरवेल (जी २५० कुटुंबांना पुरेसा पाणीपुरवठा कायम स्वरूपी प्राप्त होईल) बांधून देण्यासंदर्भात आवाहन करण्यात आले होते व त्यासाठी आम्ही प्रतिसादही दिला. ही सुविधा दि. १९ जून २०१८ रोजी रत्नागिरीतील गोळप मुस्लिम मोहला येथे सरपंच श्री. उमंग साळवी, ग्रामपंचायत सदस्य, पाणी समिती सदस्य, गावकरी आणि मुकुल माधव फाऊंडेशन आणि फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत झाली.
गोळप सरपंच तसेच गावकऱ्यांनी मुकुल माधव फाऊंडेशन आणि फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे पाण्याच्या योजनांमधील योगदानाबाबत कौतुक केले.

### पाणी प्रकल्पाचे उद्घाटन





दि. १६ जून २०१८ रोजी मुकुल माधव फाऊंडेशन आणि फिनोलेक्स इंडस्ट्रीज यांच्यातर्फे सातारा जिल्ह्यातील कटगून गावामध्ये पाणी प्रकल्पाचे उद्घाटन फिनोलेक्स इंडस्ट्रीजच्या सेल्स आणि मार्केटिंगचे व्हाईस प्रेसिडेंट, श्री. नितीन कुलकर्णी, एचआर विभागाचे जनरल मॅनेजर श्री. अशोक खडके यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यांसोबतच फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे प्रतिनिधी श्री. संतोष शेलार आणु मुकुल माधव फाऊंडेशनचे श्री. जाधव तसेच गावकरी यावेळी उपस्थित होते. जलाशयाची खोदाई आणि रुंदीकरण करण्याच्या या कामामुळे ४२० कुटुंबांना फायदा होणार आहे. हल्लीच झालेल्या पावसामुळे पाण्याची क्षमताही वाढली आहे.

### स्वच्छता
### झेडएफ गिअर आणि हिंदुजा फाऊंडेशन





दि. १२ जून २०१८ स्थळ पालघर, ग्रामीण भागातील उघड्यावरील मलविसर्जन रोखण्यासाठी तसेच स्वच्छतेला प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्रातील पालघर जिल्ह्यातील सोनाळे या मागासवर्गीय भागात मुकुल माधव फाऊंडेशन आणि फिनोलेक्स इंडस्ट्रीज यांनी सौरउर्जेवरील चालणाऱ्या दिव्यांसह ५० स्वतंत्र शोचालये बांधून दिली. याचे उद्घाटन दि. ८ जानेवारी २०१८ रोजी करण्यात आले. प्रत्येक शौचालयावर नावाची पाटी लावण्याबरोबरच एक बादली आणि एक तांब्याही लाभार्थींना स्वच्छतेच्या चांगल्या सवयी लागण्यासाठी प्रदान करण्यात आल्या.

याच प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी मुकुल माधव फाऊंडेशन यांनी पुण्यातील झेडएफ स्टिअरिंग गिअर यांना या प्रकल्पाबाबत माहिती देऊन पुढील ५० शौचालये बांधण्यासाठी हातभार मिळविला आणि त्याचेच उद्घाट्न महाराष्ट्रातील पालघर जिल्ह्यातील वडवली या गावामध्ये दि. १२ जून २०१८ रोजी करण्यात आले.

झेडएफ गिअर यांच्यासोबत हिंदुजा ग्रुप यांनीही सहाकार्य करण्याचे ठरविले असून तिसऱ्या टप्प्यामध्ये २३ शौचालये बांधणे तसेच गाळ उपसा, जलशुद्धीकरण , बोअरवेलचे बांधकाम तसेच सध्याच्या विहीरींचे आणि बांधाच्या दुरुस्तीचे काम यासाठीही ते मदत करणार आहेत. महाराष्ट्रातील पालघर जिल्ह्यातील विरे, झाडखैरे आणि केव या ३ मागासवर्गीय भागातील पाणी प्रकल्पाचेही उद्घाटन करण्यात आले. त्यामुळे १२ कुटुंबातील १२८८ लोकांना त्याचा लाभ होणार आहे.

आम्हांला आमच्या देणगीदारांचे आभार मानावेसे वाटतात.

**या महिन्यातील देणगीदार**

**राकेश बक्षी - रु. २,२५०/-**

## आमच्या सर्व उपक्रमांना पाठिंबा देणाऱ्या फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे विशेष आभार !

**मुकुल माधव फाऊंडेशन आपणाकडून मिळत आलेल्या मदतीसाठी व आधारासाठी अत्यंत आभारी आहे !!**

**आशा आहे तुम्हांला हे वार्तापत्र आवडले असेल.**

**मुकुल माधव फाऊंडेशन टीम !!!!**